DHC


# GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING

(An autonomous Institute of Government of Maharashtra)

*" In Pursuit of Goble Competitiveness"*

Staion Road , Osmanpura Aurangabad – 431 005 (MS), India

☎ - (0240)2366101,2366102,2366111,Fax:(0240)2332835

e-mail : principalgeca@yahoo.com, office.geoeaurangabad@dtemaharashtra.gov.in

web : http://www.geca.ac.in


# 8th Meeting

# of

# Finance Committee

**Date : 23th April 2018**

**Venue : T.P.O.Cell**

Minutes of Meeting

शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय,औरंगाबाद
स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद – ४३१ ००५ (महाराष्ट्र)
"In Pursuit of Global Competitiveness"
☎ - (0240)2366101, 2366102, 2366111 Fax:(0240)2332835
e-mail – principalgeca@yahoo.com web : http://www.geca.ac.in

जा.क्र. शाअमऔ/लेखा/२०१८/१२७५
दिनांक : २३/४/२०१८

आठव्या अर्थ समितीच्या बैठकीचे इतिवृतांत

दिनांक १२ एप्रिल २०१८ रोजी अर्थ समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर वैठकीत समितीसमोर अंदाजपत्रक सादर करण्यात आला होते. सदर बैठकीस खालील पदाधिकारी / अधिकारी उपस्थीत होते.

१. मा. श्री विवेक भोसले, अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ
२. मा. श्री आर.डी. वैद्य, सदस्य, व्यवस्थापन मंडळ
३. मा. देवानंद कोटगिरे सदस्य, व्यवस्थापन मंडळ
४. डॉ. पी. बी. मुरनाळ अध्यक्ष, अर्थ समिती
५. डॉ. यु. जे. कहाळेकर सदस्य, प्राध्यापक स्थापत्य अभि
६. श्री आर. आय. कोठारी निमंत्रीत सदस्य, सनदी लेखापाल
७. श्री डी. एच. चव्हाण माहिती समन्वयक अधिकारी

समिती अध्यक्ष व सर्व पदाधिकारी / अधिकारी यांनी अंदाजपत्रकाचे अवलोकन करुन कांही सुधारणा सूचविल्या होत्या. त्या सूचनेनुसार अंदाजपत्रकात सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने पुन्हा आर्थीक वर्ष २०१८-१९ करीता दिनांक २३/०४/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता डॉ पी. बी. मुरनाळ, प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण व आस्थापना विभागाच्या कक्षात अर्थ समितीची (Finance Committee) बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील पदाधिकारी /अधिकारी बैठकीस उपस्थीत होते.

१. मा. श्री विवेक भोसले, अध्यक्ष, व्यवस्थापन मंडळ
२. श्री आर.डी. वैद्य, सदस्य, व्यवस्थापन मंडळ
३. डॉ. पी. बी. मुरनाळ अध्यक्ष, अर्थ समिती
४. डॉ. यु. जे. कहाळेकर सदस्य, प्राध्यापक स्थापत्य अभि
५. श्री डी. एच. चव्हाण माहिती समन्वयक अधिकारी

पान क्र. २ वर

प्रथम प्राचार्य यांनी सर्व मान्यवरांचे व अर्थ समिती सदस्यांचे स्वागत केले व नंतर अर्थ समितीच्या बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**बाब क्रमांक १ : सातव्या अर्थ समितीच्या इतिवृतांस मंजूरी देणे.**

सातव्या अर्थ समितीच्या इतिवृता बाबत चर्चा करुन मान्यता (Approval ) दिली आहे. इतिवृत कायम करण्यात आले.

**बाब क्रमांक २ : आर्थीक वर्ष २०१७-१८ साठी विभागवार अनुदानाचे वाटप व प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मंजूरी देणे.**

अर्थ समितीने सन २०१७-१८ मध्ये संस्थेतील सर्व विभागांना आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी **रुपये १५२३.५२** लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले होते. त्या पैकी प्रत्यक्ष **रुपये ९३५.०३** लक्ष झालेल्या खर्चास मान्यता (Approval ) देण्यांत आली.

आर्थीक वर्ष २०१८-१९ या वर्षा करीता अंदाजपत्रक तयार करण्यात आला असून अर्थ समिती पुढे मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. सदर बैठकीस खालील बाबीवर चर्चा करण्यात आली आहे.

**बाब क्रमांक ३ : आर्थीक वर्ष २०१८-१९ ची संस्थेची आर्थीक स्थिती दर्शविणारे विवरणपत्र.**

संस्थेची आर्थीक स्थिती परिशिष्ट अ, ब, क व ड मध्ये दिनांक १/४/२०१८ रोजी शिल्लक असलेली जमा रक्कम रुपये **२२१४.२७ लक्ष** व सन २०१८-१९ मध्ये जमा होणारे अपेक्षीत उत्पन्न (Projected Income ) रक्कम **रुपये ३६४४.०६ लक्ष** असे **एकूण ५८५८.३३ लक्ष** दर्शविण्यात आली आहे. सदर बाब अर्थ समितीस सादर आली आहे. यावर चर्चा होऊन अध्यक्ष व इतर सर्व सदस्यांनी आर्थिक स्थितीचे निरीक्षण केले.

**बाब क्रमांक ४ : आर्थीक वर्ष २०१८-१९ साठी विविध विभांगांना वाटप करावयाचे अनुदान (आवर्ती व अनावर्ती**

संस्थेतील विविध शैक्षणीक विभाग, अशैक्षणीक विभाग व प्रशासकीय विभागास आर्थीक वर्ष २०१८ – १९ करीता लागणारी आवर्ती (Recurring ) व अनावर्ती ( Non-Recurring ) रक्कमेची माहिती सबंधीत विभागाकडून मागविण्यात आली होती. त्यांच्या मागणीनुसार विभागांना अनुदान वाटप करण्याकरीता अर्थ समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात आला होता .

पान क्र. ३वर

२ अनावर्ती यंत्रसामुग्री व फर्निचर रुपये ९२०.१६ लक्ष
३ बांधकाम रुपये २२२.१८ लक्ष

--------------

**एकूण रुपये २१४०.८८ लक्ष**

--------------

अर्थसमितीने प्रस्तावाचे अवलोकन करुन खालील विभागाच्या अनावर्ती रक्क्कमेतून खरेदी करावयाच्या यंत्रसामग्रीची रक्कम कमी करण्यांच्या सूचना दिल्या,त्यानुसार त्या खालील प्रमाणे आहेत.

(१) उपयोजित यंत्रशास्त्र विभागाचे संगणक संच खरेदीची रक्कम रु.२१.०० लक्ष, (२) स्थापत्य विभागाचे ए.सी.(वाताणूकूलीत यंत्र) रक्कम रु.५.१५ लक्ष व फर्निचर रु.०.१८ लक्ष तसेच (३) वसतिगृह विभागाचे फर्निचर रु.१७.०० लक्ष असे एकूण ४३.३३ अनुदान कमी करुन एकूण अनावर्ती प्रस्तावीत रक्कम रुपये ८७९.७५ एवढया प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सन २०१८-१९ साठी सुधारीत खर्चाचे अंदाजपत्रक खालील प्रमाणे आहे. मा. श्री भोसले , अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांनी सुचविल्याप्रमाणे 5S पध्दती कार्यन्वीत करण्यासाठी आवर्ती खर्चामध्ये रुपये ५.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

१ आवर्ती रुपये १००३.५४ लक्ष
२ अनावर्ती यंत्रसामुग्री व फर्निचर रुपये ८७६.८३ लक्ष
३ बांधकाम रुपये २२२.१८ लक्ष

--------------

**एकूण रुपये २१०२.५५ लक्ष**

--------------

संस्थेतील सर्व खरेदीची प्रक्रिया ही विभागातील लॅब ॲडीक्सी रिपोर्ट (Adquacy Report ) वाचून त्या प्रमाणे शासनाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे खरेदी करण्यात यावी असे अर्थ समितीने सुचना केल्या आहेत.

**<u>बाब क्रमांक ५ : स्टेट बॅक ऑफ इंडिया या बॅकेत जमा असलेली रक्कम यश बॅक औरंगाबाद मध्ये वर्ग करण्यास मंजूरी देणे बाबत .</u>**

स्टेट बॅक ऑफ इंडिया (पुर्वीचे स्टेट बॅक आफ हैद्राबाद स्टेशन रोड बन्सीलाल नगर औरंगाबाद ) येथे चालू खाते आहे. त्यामध्ये विदयार्थी शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क व इतर शुल्क भरणा करण्यास गेले असता ब-याची अडचणी येत होत्या. त्याकरीता व्यवस्थापन मंडळाकडून मान्यता घेवून यश बॅक अदालत रोड औरंगाबाद येथे चालु खाते उघडण्यात आले होते.

पान क्र ४ वर

स्टेट बॅक ऑफ इंडिया या शाखेतील चालू खाते बंद करुन त्यामध्ये जमा असलेली रक्कम व डिपॉजीट केलेली रक्कम सन २०१८-१९ पासून यश बॅक, अदालत रोड औरंगाबाद मध्ये जमा / वर्ग करणे व पुढील व्यवहार करण्याकरीता अर्थ समितीस सादर करण्यात आले होते. सदर बाबीवर अर्थ समितीत चर्चा करुन खाते वर्ग करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास मान्यता (Approval ) देण्यात आली.

बाब क्रमांक ६ : टेक्युप तीन बाबत

टेक्युप तीन मध्ये मार्च २०१८ पर्यत झालेली खर्च व सन २०१८-१९ वर्षाचा Action Plan अर्थ समितीस सादर करण्यात आला होता. सदरील खर्च (Vertual Account with NPIU Delhi ) यांच्या मार्फत केला जातो. ही बाब अर्थ समिती समोर ठेवण्यात आली. व समितीने वरील बाबी म्हणजेच मार्च २०१८ पर्यत झालेला खर्च, सन २०१८-१९ साठीचा Action Plan इत्यादी चे आवलोकन करुन नोंद घेतली. टेक्युपच्या मार्गदर्शक तत्वानुसार खरेदी, तसेच प्रशिक्षण इत्यादी पुर्ण करावे. अशी सुचना केली आहे. तसेच संस्थेन टेक्युप विभागास उसनवारी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेली रक्कम रुपये ९१ लाख समितीच्या निदर्शनास आणून दिले आहे. याबात चर्चा होऊन समितीने सुचना दिली की, सदर रक्कम संस्थेस त्वरीत हस्तांतरीत करण्यात यावी.

शेवटी सर्वाचे आभार व्यक्त करुन बैठक संपल्यांचे अध्यक्षांनी सांगितले.

डॉ पी.बी.मुरनाळ,
प्राचार्य तथा अध्यक्ष अर्थ समिती
शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय,औरंगाबाद

प्रत सर्व पदाधिकारी / अधिकारी यांना माहितीस्तव .